|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२७ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने दि. २ ते ५ जानेवारी २०२५ या कालावधीत पीएच.डी. प्रवेश पुर्व परीक्षा (पेट) घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी २४६४ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षा देतील.

विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पीएच.डी. प्रवेश पुर्व परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. चार दिवस चालणाऱ्या या परीक्षेत २४६४ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. ५७१ विद्यार्थ्यांना विद्यापीठाने नियमानुसार सुट दिली आहे. वाणिज्य व व्यवस्थापन विषयासाठी २१७, मानव विज्ञान कला व ललित कलेसाठी २७६, विधी ३२, मानव्य विद्या-सामाजिक विज्ञान २७२, आंतर विद्याशाखा-शिक्षणशास्त्र २१९, आंतरविद्या – आंबेडकर विचारधारा ८, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान १९५, औषधी निर्माण ३०२ आणि विज्ञान विषयासाठी ९४३ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा केंद्रात पेट परीक्षा होणार आहेत. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश पत्र ओॲसिस पोर्टलच्या लॉगिनवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. अशी माहिती विद्यापीठाच्या वतीने देण्यात आली आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि.२७ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणित विभागात राष्ट्रीय गणित दिनानिमित्त चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुज यांच्या योगदानाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली व त्यांच्या जीवनावर आधारीत चित्रपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. राष्ट्रीय गणित दिनासाठी विज्ञान व तंत्रज्ञान राष्ट्रीय परिषद, भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग आणि राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान महाराष्ट्र शासन यांच्याकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. यावेळी गणितशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. के.एफ. पवार, प्रा.एस.आर. चौधरी, प्रा.एच.एल. तिडके, प्रा. सी.टी. आगे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

राष्ट्रीय गणित दिनानिमित्त या विभागामार्फत रावेर तालुक्यातील लोहारा येथील लोकसेवक मधुकरराव चौधरी माध्यमिक आश्रम शाळा येथे गणितीय रांगोळी, पोस्टर्स तसेच प्रतिकृती स्पर्धा घेण्यात आली. शिक्षक नागेश चारपेलवार यांचे व्याख्यान झाले. प्रा. एस.आर. चौधरी मार्गदर्शन केले. संचालक प्रा.के.एफ. पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. **रांगोळी स्पर्धेत** ज्योती भिलाला (प्रथम), नंदीनी जाधव (द्वितीय), प्रमिला चौधरी (तृतीय) व प्रिया भिलाला (उत्तेजनार्थ), **मॉडेल स्पर्धेत** समिक्षा भालेराव (प्रथम), कोमल पवार (द्वितीय), राणी पवार (तृतीय), प्रमिला चौधरी (उत्तेजनार्थ**), पोस्टर्स स्पर्धेत** नंदन तडवी (प्रथम), शाहीन तडवी (द्वितीय), मारीया तडवी (तृतीय), विद्या भालेराव (उत्तेजनार्थ) हे विजेते ठरले. यावेळी मुख्याध्यापक सुनील सपकाळे, शितल पाटील उपस्थित होते. राकेश पाटील यांनी सुत्रसंचालन केले. मिनाक्षी महाजन यांनी आभार मानले.

....................................................................................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २७ डिसेंबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी